# <u>प्रेसनोट</u>                                                दि. १८/१०/२०२३

**सांगवी पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड, पुणे येथील सहायक पोलीस फौजदारावर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | सांगवी पोलीस स्टेशन, पिंपरी – चिंचवड |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७. |
| तक्रारदार | महिला, वय - ४५ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | सुनील शहाजी जाधव, वय ४९ वर्ष, पद - सहायक पोलीस फौजदार (वर्ग-३), नेमणुक - सांगवी पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड, पुणे |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ६०,०००/- रुपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ५०,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २५,०००/- रुपये (पंचवीस हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | १८/१०/२०२३ |
| सापळा दिनांक | १८/१०/२०२३ |

ठिकाण :- पिंपळे सौदागर पोलीस चौकीमध्ये.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचे घराचे बांधकाम पिंपळे सौदागर येथे चालु असून, सदर बांधकामाचे कॉन्ट्रॅक्ट बांधकाम व्यवसायिक कराळे यांना दिले होते. घराचे बांधकामाबाबत कॉन्ट्रक्टर कराळे व तक्रारदार यांच्यात करार झाला होता. करारानुसार बांधकाम व्यवसायिक यांनी काम वेळेत पूर्ण केले नाही व तक्रारदार यांचे ताब्यात असलेले कॉन्ट्रक्टरचे बांधकाम साहित्य कॉन्ट्रक्टर हे तक्रारदार यांच्याकडे मागत होते. परंतू सदरचे बांधकाम पुर्ण झाल्यावर बांधकाम साहित्य देण्यात येईल असे तक्रारदार यांनी कॉन्ट्रक्टर कराळे यांना सांगितले. त्यामुळे कॉन्ट्रक्टर कराळे यांनी तक्रारदार यांचे विरोधात सांगवी पोलीस स्टेशन येथे तक्रारी अर्ज दिला होता. सदर तक्रार अर्जाची चौकशी लोकसेवक सुनील जाधव हे करत होते. सदर तक्रारी अर्जावरुन तक्रारदार यांचेविरुद्ध कारवाई न करण्यासाठी व गुन्हा दाखल न करण्यासाठी लोकसेवक सुनील जाधव यांनी तक्रारदार यांचेकडे ६०,०००/- रुपये लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता, लोकसेवक सुनील जाधव यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचेविरुद्ध कारवाई न करण्यासाठी व गुन्हा दाखल न करण्यासाठी ६०,०००/- रुपये लाचेची पंचासमक्ष मागणी करुन, तडजोडीअंती ५०,०००/- रुपये (पन्नास हजार रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष मागणी केली व सदरची रक्कम दोन टप्प्यात देण्यास सांगून, तक्रारदार यांचेकडून पहिला टप्प्यातील रक्कम रुपये २५,०००/- (पंचविस हजार रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली. लोकसेवक सुनील जाधव याना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध सांगवी पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक प्रणेता सांगोलकर तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४

२) अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३

३) व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३

४) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००

५) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**

६) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**

७) ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.